पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ३२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.०७ नोव्हेंबर, २०२३ दुपारी १२:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभेची ३२ वी बैठक मंगळवार, दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश महानवर - मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>प्रभारी अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. मलिक सगाजी रोकडे, प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ७) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. अंजना एस. लावंड,<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ | सदस्या | उपस्थित |
| ९) | विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर<br>(मा. प्रभारी शिक्षण संचालक (उ.शि.), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी) | सदस्य | अनुपस्थित |
| १०) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| ११) | श्री. चंद्रकांत गोपाल गार्डी, प्र. संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र | सदस्य | उपस्थित |
| १२) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, प्र.संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग | सदस्य | उपस्थित |
| १४) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १५) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| १६) | प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | उपस्थित |
| १७) | प्राचार्य डॉ. सत्यजित कांतिलाल शाह | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १८) | प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर | सदस्य | उपस्थित |
| १९) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिरा कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| २०) | श्री. अजिंक्यराणा राजन पाटील | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २१) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | उपस्थित |
| २२) | श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे | सदस्य | उपस्थित |
| २३) | श्री. वैभव रणजित गांधी | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २४) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| २५) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| २६) | डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | सदस्या | उपस्थित |
| २७) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य | उपस्थित |
| २८) | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य | उपस्थित |
| २९) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | सदस्य | उपस्थित |
| ३०) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ३१) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३२) | डॉ. नितीन लहानू तळपाडे | सदस्य | उपस्थित |
| ३३) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३४) | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | सदस्य | उपस्थित |
| ३५) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | सदस्या | अनुपस्थित |
| ३६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ३७) | डॉ. विकास दादाभाऊ कडू | सदस्य | उपस्थित |
| ३८) | डॉ. श्रीमती माया जगदीश पाटील | सदस्या | उपस्थित |
| ३९) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य | उपस्थित |
| ४०) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य | उपस्थित |
| ४१) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | सदस्य | उपस्थित |
| ४२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| ४३) | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| ४५) | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्या | उपस्थित |
| ४६) | श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| ४७) | ॲड. नीता सुरेशबाबू मंकणी | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४८) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | सदस्या | उपस्थित |
| ४९) | श्री. संजय नामदेव साळुंखे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ५०) | श्री. सुदर्शन मसु यादव | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ५१) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य | उपस्थित |
| ५२) | श्री. माधव धोंडोपंत देशपांडे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ५३) | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | सदस्य | अनुपस्थित |
| ५४) | डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | सदस्य | उपस्थित |
| ५५) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | सदस्य | उपस्थित |
| ५६) | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्या | उपस्थित |
| ५७) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | सदस्या | उपस्थित |
| ५८) | श्रीमती माधवी श्रीपाद पारेकर | सदस्या | उपस्थित |
| ५९) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | सदस्य | उपस्थित |
| ६०) | श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६१) | श्री. यशवंत विठ्ठल माने, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६२) | श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, विधानपरिषद सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६३) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे कुलगुरु पदी रुजू झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी विद्यापीठाच्या व सर्व अधिसभा सदस्यांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

तसेच खालील सदस्यांची पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरुमहोदय यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

| | |
|---|---|
| डॉ. मलिक सगाजी रोकडे<br>प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | डॉ. अंजना एस. लावंड<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य |

**श्रध्दांजली:**

अधिसभेचे सदस्य कै. प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि.१५/१०/२०२३ रोजी हृदयविकाराने आकस्मित दुख:द निधन झाल्याने त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

अनुपस्थिती:

अधिसभेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. सत्यजित शाह, श्री. अजिंक्यराणा पाटील, श्री. वैभव गांधी, डॉ. प्रभाकर कोळेकर, श्री. अजिंक्य देशमुख, ॲड निता मंकणी, श्री. संजय साळुंखे, श्री. सुदर्शन यादव व श्री. माधव देशपांडे यांनी पत्राद्वारे/दुरध्वनीद्वारे/इमेलद्वारे/Whatsapp द्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

कुलसचिवांनी मा. कुलगुरुंना अधिसभेच्या ३१ व्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडींचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

| अ.क्र. | कुलसचिव कार्यालय |
|---|---|
| १. | प्रस्तुत विद्यापीठाचा १९ वा वर्धापन दिन समारंभ दि. ०१ ऑगस्ट, २०२३ सोलापूर शहरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आला. सदरील समारंभामध्ये भारताचे मा. माजी सरन्यायाधीश श्री. उदयजी लळीत यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. |
| २. | विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले: |

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कार्थींचे नाव |
|---|---|---|
| १) | उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, केगाव, सोलापूर. |
| २) | उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले<br>एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, केगाव, सोलापूर. |
| | | प्राचार्य डॉ. राजशेखर सोमशेखर हिरेमठ<br>श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर. |
| ३) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सोलापूर. (विद्यापीठ) | डॉ. रवींद्र भास्करराव चिंचोलकर<br>सामाजिकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |
| | | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते, संगणशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |
| ४) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सोलापूर. (महाविद्यालय) | प्रा. डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर. |
| | | प्रा. डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण<br>वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर. |
| ५) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (विद्यापीठ) | डॉ. अभिजित हनुमंत जगताप, वैद्यकिय अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |
| | | डॉ. उमराव विठ्ठल मेटकरी<br>उपकुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. |

| | |
|---|---|
| | **आस्थापना विभाग: -** |
| ३. | **संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाची पदभरती:**<br>डॉ. सुरेश किसनराव पवार हे दि. ३१/०८/२०२२ रोजी नियत वयोमानानुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावरुन सेवानिवृत्त झाल्याने सदर रिक्त पदाची पदभरती करणेकामी दि. १९/११/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन प्राप्त आवेदनपत्रांची छाननी प्रक्रिया पूर्ण करुन पात्र ठरलेल्या तीन उमेदवारांची दि. ३१/०३/२०२३ रोजी मुलाखत आयोजित करण्यात आलेली होती. तथापि, डॉ. प्रकाश बच्छाव, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दि. २५/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये वित्तीय वर्षाअखेर असल्याने नियोजित मुलाखतीस मा. संचालक यांना उपस्थित राहता येणार नसल्याने सदर मुलाखत रद्द करणेबाबत कळविले असल्याने सदर पदभरती करणेकामी निवड प्रक्रियेबाबत शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. |
| ४. | **संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदाची पदभरती:**<br>डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर हे दि. ३१/०७/२०२३ रोजी नियत वयोमानानुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावरुन सेवानिवृत्त झाल्याने सदर पदभरतीचे जाहिरात दि. ०५/०९/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, त्यास अनुसरुन प्राप्त आवेदनपत्रांची छाननी करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| ५. | **अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा व अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदांची पदभरती:**<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये रिक्त असलेल्या अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा व अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा ही दोन्ही पदे भरणेकामी मंजुरीचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला असून त्यांचेकडून पदभरतीस मंजुरी प्राप्त होताच जाहिरातीबाबतचे विहित कार्यवाही सुरु करण्यात येईल. |
| ६. | **वार्षिक वेतनवाढ अदा करणे:**<br>महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०७/१०/२००९, ०८/०३/२०१९ व ०८/१२/२०२० रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार जुलै २०२३ मध्ये वार्षिक वेतनवाढ देय झालेल्या शिक्षकीय संवर्गातील संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना १ जुलै, २०२३ चे वार्षिक वेतनवाढ अदा करण्यात आलेले आहेत. |
| ७. | **सेवापुस्तिका अद्यावत करणे:**<br>प्रस्तुत विद्यापीठातील आस्थापनेवर कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तके अद्यावत करण्यात आलेले आहेत. |
| ८. | **अर्जित रजा रोखीकरणाचे सुधारित प्रस्ताव:**<br>प्रस्तुत विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या व सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे अर्जित रजा रोखीकरण झालेल्या एकुण २१ अधिकारी कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अर्जित रजा रोखीकरणास मंजुरी मिळणेकामीचे विहित प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर यांचेकडे सादर करण्यात आले असता त्यास मंजुरी प्राप्त झालेले असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे. |
| ९. | **सेवानिवृत्ती वेतनाचे प्रस्ताव:**<br>१) डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर हे दि. ३१/०७/२०२३ रोजी नियत वयोमानानुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावरुन सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | |
|---|---|
| | अर्जित रजा रोखीकरणाच्या प्रस्तावाबाबत विहित कार्यवाही पूर्ण होऊन त्यास मा. विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून मंजुरी प्राप्त झालेली असून त्यास अनुसरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.<br>२) तसेच डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेचा विहित प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| १०. | **मा. कुलगुरु महोदयांची नियुक्ती:**<br>मा. कुलपती महोदयांनी दि. २९/०९/२०२३ रोजीच्या आदेशाद्वारे माझी (प्रा. डॉ. प्रकाश महानवर) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे कुलगुरु या पदावर नियुक्ती केली असून त्यास अनुसरुन मी (प्रा. डॉ. प्रकाश महानवर) दि. ०६/१०/२०२३ रोजी कुलगुरु या पदावर रूजू झालो आहे. |
| ११. | **शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदोन्नती:**<br>१) प्रस्तुत विद्यापीठाच्या आस्थापनेवरील उपकुलसचिव या पदाच्या पदोन्नती कोट्यामध्ये रिक्त असलेल्या व त्या अनुषंगाने संभाव्य पध्दतीने रिक्त होणाऱ्या पदावर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी गठीत विभागीय पदोन्नती समितीने (वर्ग १ व २) केलेल्या शिफारशीप्रमाणे कायदेशीर अभिप्राय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>२) गट 'ड' च्या एकत्र सेवाजेष्ठता यादीबाबत व गट 'क' मधील कनिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नतीबाबत मा. शिक्षण संचालक, पुणे यांनी गठीत समितीने सादर केलेल्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मा. शिक्षण संचालक महोदयांनी आदेश दिले नसल्याने याबाबत मा. शिक्षण संचालक, पुणे यांचेशी पत्रव्यवहार सुरु असून याबाबत आदेश प्राप्त होताच पदोन्नतीबाबत उचित कार्यवाही करण्यात येणार आहे. |
| | **अभियांत्रिकी विभाग:-** |
| १२. | प्रस्तुत विद्यापीठाच्या विस्तारासाठी संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीमध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या मुख्य प्रशासकीय व परीक्षा भवन इमारतीचे तिन्ही मजल्याचे आर. सी. सी. व वीट बांधकाम पूर्ण झाले, दोन मजल्याचे फरशी बसविण्याचे काम पूर्ण झाले व दुसऱ्या मजल्यापर्यंतचे प्लास्टरचे काम पूर्ण झालेले असून पुढील बांधकामास सुरुवात झाली आहे. |
| १३. | मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीच्या इलेक्ट्रीकफिकेशन व अग्निशामक यंत्रणा बसवण्याचे काम सुरु आहे. |
| १४. | विद्यापीठास रुसा निधी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून विद्यापीठ परिसरात मुलांचे वसतिगृहाच्या ब्लॉक 'अ' व 'ब' इमारतीचे पहिल्या मजल्याचे वीट बांधकाम पूर्ण झाले, पहिल्या मजल्याचे स्लॅब व पहिल्या मजल्याचे फरशी बसविण्याचे काम तसेच पहिल्या मजल्याचे प्लास्टरचे काम पूर्ण झालेले आहे. |
| १५. | विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या रुसा निधी अंतर्गत सर्व कामे पूर्ण झाले आहेत. |
| १६. | विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात संपूर्ण परिसरास सुरक्षा भिंतचे बांधकाम सुरु आहे. |
| १७. | खेलो इंडिया योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या मल्टीपर्पज हॉलच्या स्थापत्य बांधकामाची कामे पुर्ण झाली आहेत. |
| १८. | जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, जि. पुणे येथे रुसा निधी अंतर्गत पुरातत्त्व वस्तू संग्रहालय व माहिती केंद्र तयार करण्याच्या कामामध्ये साईन बोर्ड, कार्पेट, फॅब्रीकेशन आणि पेंगिचे काम, फॉल सिलींगचे काम, इलेक्ट्रीकलचे काम व पडदे खरेदी करुन बसविणे इत्यादी स्थापत्य कामे तसेच फर्निचर कामामधील इंटेरिअर डिसप्ले कपबोर्ड युनिट व स्टोअरेज व बुक सेल्फचे इत्यादी सर्व कामे पूर्ण झाली आहेत. |

| | |
|---|---|
| १९. | विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक बांधकाम व टॉवर बांधकाम इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर यांच्या मार्फत सुरु आहे. |
| | **अभ्यासमंडळे विभाग:-** |
| २०. | अभ्यासमंडळे विभागाकडून दि. ०१ जुलै, २०२३ ते दि. १७ ऑक्टोबर, २०२३ अखेर पर्यंत राष्ट्रीय शै. धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चारही विद्याशाखांच्या विविध अभ्यासमंडळांतर्गत येणाऱ्या विषयांचे शै. वर्ष २०२४-२५ साठी विविध विषयांचे पदवी अभ्यासक्रमाचे पाठ्यक्रम तयार करण्याचे काम उपसमिती व अभ्यासमंडळांकडून करण्यात आले. अभ्यासमंडळांच्या बैठकीमध्ये मान्यता देऊन विद्याशाखेकडे शिफारस करण्यात आली. |
| २१. | अभ्यासमंडळे विभागास शासनाकडून प्राप्त झालेल्या राष्ट्रीय शै. धोरण २०२० संदर्भातील पत्रांवर कार्यवाही करुन वेळेमध्ये उत्तरे देण्याचे काम करण्यात आले, तसेच सुकाणू समितीचे सदस्य मा. डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांच्या बैठका आयोजित करण्यात आल्या. |
| २२. | अभ्यासमंडळे विभागाकडे परीक्षा विभागाकडून देण्यात आलेल्या N+२ संदर्भातील विद्यापीठास विविध विद्यार्थी संघटना व महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या अर्जांविषयी व्यवस्थापन समितीकडून गठीत करण्यात आलेल्या कमिटीच्या बैठका घेऊन N+२ विषयी कमिटी कडून तयार करण्यात आलेली नियमावली विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये ठेवून विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. |
| २३. | अभ्यासमंडळे विभागाकडे परीक्षा विभागाकडून देण्यात आलेल्या Carry on संदर्भातील विद्यापीठास विविध विद्यार्थी संघटना व महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या अर्जांविषयी विद्यापरिषदेकडून गठीत करण्यात आलेल्या कमिटीच्या बैठका घेऊन Carry on विषयी कमिटी कडून तयार करण्यात आलेली नियमावली परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे देण्यात आलेली आहे. |
| २४. | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सर्व संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ परिसर संकुलांकडून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय/राज्य/विभागीय पातळीवर सुधारित अभ्यासक्रमावर आयोजित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदांसाठी अंशत: अनुदान मंजूर करण्याबाबत विद्यापीठ पत्र जा. क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२३/७१०४ दि. ३० सप्टेंबर, २०२३ रोजी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. |
| | **तक्रार निवारण कक्ष:-** |
| २६. | उप समितीची बैठक दि.३१/८/२०२३ रोजी आयोजित करून दोन अर्जाची छाननी करण्यात आली. |
| | **आयक्युएसी विभाग :-** |
| २७. | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील नॅक मूल्यांकन न झालेल्या महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन होण्याच्या दृष्टीने परीस - स्पर्श योजनेच्या अंमजबजावणीसाठी चर्चा करण्याकरीता गठीत करण्यात आलेले विद्यापीठस्तरीय समितीचे सदस्य यांचे दि. २७ जुलै, २०२३ रोजी मा. प्र-कुलगुरु व मा. संचालक, आयक्युएसी यांच्यासमवेत बैठक घेण्यात आलेली होती. |

| | |
|---|---|
| २८. | विद्यापीठस्तरीय समितीचे सदस्य, डॉ. प्रमोद पाबरेकर, वरिष्ठ सल्लागार, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मा. प्र-कुलगुरु व मा.संचालक, आयक्युएसी यांच्या समवेत परीस - स्पर्श योजनेचा आढावा घेण्यासाठी दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी बैठक घेण्यात आलेली होती. |
| २९. | दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी उच्चतर शिक्षा अभियान (उषा) कार्यशाळा प्रस्तुत विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदरच्या कार्यशाळेत प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्रतिनिधी व इतर समितीचे सदस्य उपस्थित होते. |
| | **शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग: -** |
| ३०. | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन अभ्यासपाठ्यक्रम, तुकडी, विद्याशाखा, विषय सुरु करणेबाबत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून २१ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी १९ प्रस्तावास दि.१५/०६/२०२३ नुसार शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. शासनाकडून मंजुरी मिळालेल्या १९ प्रस्तावास प्रथम संलग्निकरण देणेबाबतची विहित कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे. |
| ३१. | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन महाविद्यालय सुरु करणेबाबत शासनाच्या दि.१५/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ०५ नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मंजूरी मिळालेली आहे. त्यापैकी ०४ नवीन महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण देणेबाबतीच विहित कार्यवाही पूर्ण झाली आहे. |
| ३२. | शैक्षणिक वर्ष २०२३- २४ साठी जलदगती तुकडी सुरु करणेबाबत विद्यापीठाकडून शासनास सादर केलेल्या ०६ प्रस्तावास मंजूरी मिळालेली आहे. त्यापैकी ०१ प्रस्तावास संलग्निकरण देणेबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उर्वरित ०५ प्रस्तावाची कार्यवाही सुरु आहे. |
| ३३. | प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करुन विविध प्राधिकरणाची मान्यता घेऊन दि.०३/०८/२०२३ रोजी तीन प्रती मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांना सादर करण्यात आले आहे. |
| ३४. | दि.२२/०९/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करणेकामी दि.२६/०९/२०२३ रोजी स्थानिक वर्तमान पत्रातून जाहीर आवाहन करण्यात आले असून त्या अनुषंगाने विविध संस्थांकडून १० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची विहित कार्यवाही सुरु आहे. |
| ३५. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, तुकडी, विद्याशाखा सुरु करणेबाबत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांकडून ५८ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची विहित कार्यवाही सुरु आहे. |
| | **परीक्षा व मूल्यमापन विभाग: -** |
| ३६. | पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा माहे नोव्हेंबर / डिसेंबर -२०२३ मध्ये घेण्याचे नियोजन असून त्याअनुषंगाने परीक्षा अर्ज भरणे ते विद्यार्थ्यांचा निकाल / गुणपत्रक छपाई इत्यादी सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| ३७. | एकूण -१२ विद्यार्थ्यांना पीएच.डी. Notification देण्यात आले आहेत. |
| ३८. | मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील Examiner, Moderator & Reval यांची विषयनिहाय पेपर तपासणीची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. |

| | |
|---|---|
| ३९. | मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील अभियांत्रिकी विद्याशाखेच्या प्रलंबित उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन त्वरीत होण्याच्या दृष्टीने उत्तरपत्रिका तपासणी करण्यास पाठपुरावा करण्यासाठी (Special Drive) विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची संलंग्नित ५ अभियांत्रिकी महाविद्यांलयामध्ये डयुटीचे कार्यालयीन आदेश काढण्यात आलेले होते. सदर कालावधीमध्ये उत्तरपत्रिका तपासणीस चांगला प्रतिसाद मिळालेला होता. |
| ४०. | Invalid PRN संदर्भातील ५६ उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्यात आलेले असून सदरचे गुणपत्रक पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांकडे पाठविण्यात आलेले आहेत. |
| ४१. | ऑक्टोबर / नोव्हेंबर - २०२२ व मार्च / एप्रिल - २०२३ या परीक्षा सत्रातील विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्या अभ्यासक्रमांच्या निकालामध्ये RR/AB/EHB/ Zero/Status Effect याबाबत त्रुटी आलेल्या आहेत त्या त्रुटींचे निरसन करण्याकरिता सिंहगड कॅम्पस कॅप याठिकाणी दोन वेळा कॅम्प चे आयोजन करण्यात आले. |
| ४२. | मार्च / एप्रिल - २०२३ या परीक्षा सत्रातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व प्रोव्हिजनल सर्टिफिकेट महाविद्यालयास देण्यात आले. |
| ४३. | महाविद्यालयांकडून / विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आली. |
| ४४. | ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ या परीक्षा सत्रातीलविद्यार्थ्यांचे गुणपत्रक मविद्यालयास देण्यात आले. |
| | **वित्त व लेखा विभाग: -** |
| ४५. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सन २०२१-२२ आर्थिक वर्षाचे सांविधानिक लेखापरीक्षण पूर्ण झाले असून त्यासवित्त व लेखा समिती, व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस स्वीकारुन त्यास अधिसभेने मान्यता दिली आहे. |
| ४६. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सन २०२२-२३ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अंदाजपत्रकास अधिसभेने दुरूस्तीसह मान्यता दिलेली असून सदरचे अंदाजपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. |
| ४७. | विद्यापीठात विविध बैठकांसाठी व इतर कार्यालयीन कामासाठी येणा-या प्राध्यापक व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्या प्रवास भत्ता/दैनिक भत्याची देयके तसेच दैनंदिन खर्चाची, विविध फर्मना द्यावयाच्या देयकाची आदायगी देखील बँक ऑफ इंडिया कार्पोरेट नेट बँकिंग द्वारे आदा करण्यात येत आहेत. |
| ४८. | विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना विविध कामाकरिता देण्यात येणाऱ्या तसलमातीची आदायगी तसेच इतर देयकाची आदायगी देखील बँक ऑफ इंडियाच्या कार्पोरेट नेट बँकिंगद्वारे आदा करण्यात येत आहेत. |
| ४९. | प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन एकच लेखाशीर्षक २२०२०६८३ मधून करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांनी मान्यता दिली आहे. |
| | **ज्ञानस्रोत केंद्र: -** |
| ५०. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्राकडून खरेदी करण्यात आलेल्या Turnitine Plagiarism Software व्दारे विद्यापीठ नियमावलीनुसार इतर महाविद्यालयांना Subscription फी रु. १०,०००/- भरुन Software वापरासंबधीचा Login ID, Password व वापरासबंधीचे प्रशिक्षण ज्ञानस्रोत केंद्राकडून देण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ५१. | नियमित विद्यापीठ अंदाजपत्रकातून पुस्तके व नियतकालिके खरेदीची प्रक्रीया सुरु आहे. |
| ५२. | खरेदी केलेल्या पुस्तकांच्या याद्या, नियतकालिके याद्या, e- Books च्या याद्या sus.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Knowledge Resources Centre या मथळ्याखाली लिंक देण्यात आली आहे. |
| ५३. | प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्याची प्रक्रियाकरिता Online Form भरुन घेणे सुरु आहे. |
| ५४. | व्दितीय वर्ष पुर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना No Dues देण्याची प्रक्रिया Online स्वरुपामध्ये फॉर्म भरुन घेऊन सुरु आहे. |
| ५५. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्रात दि.१२/०८/२०२३ रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती प्रतिमेचे पूजन करुन साजरी करण्यात आली. |
| ५६. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राची २६ वी बैठक दि.०५/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. |
| ५७. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्रात शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या करिता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त दि. १६ ऑक्टोबर, २०२३ ते २१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत ग्रंथ प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात आला. |
| ५८. | ज्ञानस्त्रोत केंद्राकडून नव्याने संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी मदत व्हावी या दृष्टीने शोधप्रबंध शोधगंगा या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम सुरु आहे. |
| ५९. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्रासाठी Mapmy Access हे Software खरेदी करण्याची प्रक्रिया ज्ञानस्त्रोत केंद्राकडून सुरु आहे. |
| | **क्रीडा विभाग: -** |
| ६०. | सन २०२३ या वर्षी वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स चेंगडू (चायना) येथे दि.२८ जुलै २०२३ ते दि.०८ ऑगस्ट २०२३ या कालावधीत आयोजित केलेल्या स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाचे खेळाडू श्री. अरुण धनसिंग राठोड यांनी २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन या क्रीडा प्रकारात सहभाग नोंदविला. |
| ६१. | दि.२९ ऑगस्ट २०२३ राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रावीण्य प्राप्त केलेले खेळाडू तसेच संघासोबत गेलेले प्रशिक्षक व मार्गदर्शक यांचा सत्कार मा. श्री. अमित कुलकर्णी सातारा व मा. श्री. शिवाजी ननवरे (एव्हरेस्टवीर) पोलीस उपनिरीक्षक पुणे यांच्या हस्ते विद्यापीठ सभागृहात करण्यात आला. |
| | **राष्ट्रीय सेवा योजना:-** |
| ६२. | दि.३ जुलै, २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज ३५० व्या राज्यभिषेक दिनानिमित्त सर्व युवतींना हिंसाचाराविरुध्द मनोबल उंचावण्यासाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी संभाजी तलावाजवळ जुना संतोष नगर, जुळे सोलापूर येथे सकाळी ९:०० वाजता आयोजित करण्यात आले होते. सदरच्या कार्यक्रमात १२ महविद्यालयांतील ३५० विद्यार्थ्यींनी सहभागी झालेल्या होत्या. तरी सहभागी झालेल्या विद्यार्थिनींना आयोजक महाविद्यालयाकडून सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले आहे. |
| ६३. | सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील दि.१०/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार धुम्रपान व तंबाखूच्या सेवनापासून तरूणांना, युवा पिढीना आणि सामान्यांना दूर ठेवण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमार्फत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | |
|---|---|
| ६४. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व विकासार्थ विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२/०७/२०२३ रोजी हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे युवा संवाद-भारत@२०४७ हा कार्यक्रम संपन्न झाला. सदरच्या कार्यक्रमामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे सर्व सांविधानिक अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या एकूण २२ महाविद्यालयांमधून सुमारे ८५० विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. |
| ६५. | केंद्र शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार "मेरी माती मेरा देश" अर्थात "माझी माती माझा देश" या उपक्रमातंर्गत दि.०९ ते १५/०८/२०२३ दरम्यान प्रस्तुत विद्यापीठांमार्फत दि.०९/०८/२०२३ रोजी पंच प्रण शपथ सेल्फी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते व दि.१४/०८/२०२३ रोजी वसुधा वंदन, वीरोंका नमन व वृक्षारोपण कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते. तसेच दि.१५/०८/२०२३ रोजी ध्वजारोहण व राष्ट्रगाण कार्यक्रम संपन्न झाला आहे. तरी सदरच्या कार्यक्रमाकरिता प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविवैधानिक अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. |
| ६६. | केंद्र शासनाच्या निर्देशानुसार "मेरी माती मेरा देश" अर्थात "माझी माती माझा देश" या उपक्रमातंर्गत दि.०९ ते १५/०८/२०२३ दरम्यान पंच प्रण शपथ, सेल्फी , वसुधा वंदन, वीरोंका नमन, ७५ वृक्षारोपण कार्यक्रम तसेच दि.१५/०८/२०२३ रोजी ध्वजारोहण व राष्ट्रगाण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. व त्याचे सेल्फी व फोटो शासनाच्या https://yuva.gov.in/meri_maati_mera_desh या वेबसाईटवर अपलोड करण्यात आले आहेत व येत आहेत. |
| ६७. | दि.१५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त "हर घर तिंरगा" या माहिमे अंतर्गत ध्वजारोहण करण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने २०० नग तिरंगा ध्वज विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वितरण करण्यात आले आहे. तरी सदरचे तिरंगा ध्वज प्रत्येकाने आपल्या घरावर ध्वजरोहण करुन 'हर घर तिरंगा' हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यात आला. |
| ६८. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि छत्रपती सर्वोचार रुग्णालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.५ सप्टेंबर, २०२३ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ परिसरात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरामध्ये एकूण ४४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. |
| ६९. | दि.२७ ते २९ सप्टेंबर, २०२३ या दरम्यान २०२३-२४ राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन NRD/ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन SRD निवड चाचणी शिबिर प्रस्तुत विद्यापीठामध्ये संपन्न झाला आहे. सदरच्या निवड चाचणी शिबिरासाठी महाराष्ट्रातील विविध २३ विद्यापीठामधून २२० विद्यार्थी, विद्यार्थिनी व संघव्यवस्थापक सहभागी झाले होते. |
| ७०. | दि.२७ ते २९ सप्टेंबर, २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन NRD/ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन SRD निवड चाचणी शिबिरामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचा ०६ मुली ०४ मुले व १ संघव्यवस्थापक असा एकूण ११ जणांचा संघ सहभागी झाला होता. सदरच्या निवड चाचणी शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यापीठ संघातील कु. सुकेशनी औदुंबर गव्हाणे, के.बी.पी. महाविद्यालय, पंढरपूर व कु. रिया दशरथसिंग परदेशी, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या दोन मुलींची दि.०१/११/२०२३ ते दि.१०/११/२०२३ या कालावधीमध्ये K. L. University Vaddeswaram, Mangalagiri Vijaywada, Andra Pradesh येथे आयोजित करण्यात आलेल्या पश्चिम विभागीय राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन-२०२३ करिता निवड झाली आहे. |

| | |
|---|---|
| ७१. | भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार ०१/१०/२०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण करणारे नव मतदार यांची नोंदणी अभियानाचे काम सोलापूर जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालय यांच्या संगनमताने प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. |
| ७२. | १ ऑक्टोबर, २०२३ महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून "स्वच्छता ही सेवा" या उपक्रमातंर्गत दि.३१/०९/२०२३ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या दरम्यान विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्यात आली. सदरच्या स्वच्छता मोहिमेमध्ये प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. |
| ७३. | दि.०१/१०/२०२३ ते दि.३१/१०/२०२३ या कालावधीमध्ये "फिट इंडिया फिंडम रण ४.०" मोहिमेअंतर्गत "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या थीमसह उत्तम आरोग्य, फिटनेस व लोकांमध्ये चालण्याची व धावण्याची सवय लावणे या निरोगी जीवनशैलीसाठी प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. |
| ७४. | "विशेष कार्यक्रम ३.० स्वच्छता ही सेवा" या मोहिमे अंतर्गत दि.०२/१०/२०२३ ते ३१/१०/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. |
| | **विद्यार्थी विकास विभाग :-** |
| ७५. | दरवर्षीप्रमाणे संलग्न महाविद्यालयाची सृजनरंग नियतकालिक स्पर्धा २०२२ -२३ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ३२ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. पाच महाविद्यालयांनी सर्वसाधारण पारितोषिक पटकावले आहे. |
| ७६. | सन २०२३-२४ या वर्षासाठी विद्यापीठ व सर्व संलग्न महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांचा विमा उतरविण्यासाठी टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. लातूर यांच्या सोबत करार करण्यात आला आहे. प्रति विद्यार्थी व एक कमावता पालक याच्या विमा क्लेमची रक्कम रू.१०, ००,०००/- साठी रू १६०/- प्रमाणे विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा रू २०,०००,००/- प्रमाणे आपघाती विमा उतरविण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठात सुरू आहे. |
| ७७. | दि.१० ते १३ ऑक्टोबर २०२२ या दरम्यान विद्यापीठाच्या १९ व्या युवा महोत्सवाचे आयोजन स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथे करण्यात आले होते. सदर युवा महोत्सवात एकूण ६६८ मुले ७१७ मुली तसेच १६९ संघव्यस्थापक असे एकूण १५५४ जण सहभागी झाले होते. युवा महोत्सवात सर्व साधारण विजेते पदाचे प्रथम क्रमांकाचा चषक शंकरराव माहिते महाविद्यालय, अकलूज यांना तर व्दितीय क्रमांकाचा चषक श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांनी, तृतीय क्रमांकाचे चषक डी बी एफ दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांनी पटकावले. |
| ७८. | राजभवन आयोजित इंद्रधनुष्य युवा महोत्सवाचे आयोजन दि०५ ते ०९ नोव्हेंबर २०२३ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर युवा महोत्सवात उत्तम सादरीकरण होण्याच्या दृष्टीने स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथे दि.२०/१०/२०२३ पासून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. |

| | |
|---|---|
| | **नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ: -** |
| ७९. | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ व स्वावलंबी भारत अभियान, पश्चिम महाराष्ट्र, सेवावर्धिनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने उद्योजकता विकास यात्रा दि.२१ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२३ पर्यंत आयोजित करण्यात आली होती. सदर उद्योजकता विकास यात्रा या उपक्रमाची माहिती इन्क्युबेशन टिम व स्वावलंबी भारत अभियान टिम मिळून सोलापूर जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील लोकांना, ग्रामपंचायत सदस्यांना व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून सदर उद्योजकता विकास यात्रेचे व स्वयंरोजगारविषयक शासकीय योजनाची माहिती देण्यात आली आहे. |
| ८०. | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या (NEP घरोघरी) या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० दिंडी या मोहिमेचा शुभारंभ दि.२६/०७/२०२३ रोजी मा. प्रभारी कुलगुरु डॉ. राजनीश कामत, यांच्या हस्ते करण्यात आला. सदर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती (NEP) सोलापूर जिल्ह्यातील विविध गावातील ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांना, विद्यार्थ्यांना, पालकांना व तसेच इतर घटकांना देण्यात आली. |
| ८१. | मा. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांनी E-Yuva, BIRAC अंतर्गत १ करोड ३६ लाखाचा प्रोजेक्ट भारत सरकारला सादर केला असता, पहिल्या फेरीतच या प्रोजेक्टला मान्यता मिळाली आहे. |
| ८२. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ अंतर्गत उद्यम-PAHSUI फाउंडेशनच्या वतीने दि.१८/०८/२०२३ रोजी इन्क्युबेटरसाठी आयडिया सादरीकरण या स्पर्धेचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आली होती. |
| ८३. | प्रस्तुत विद्यापीठांतर्गत राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवामध्ये सहभागी होऊन त्यामध्ये विजेत्या ठरलेल्या ४ स्पर्धकांना आविष्कार शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. |
| | **आरोग्य केंद्र व आरोग्य विज्ञान संकुलः-** |
| ८४. | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील वैद्यकीय विद्यार्थ्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत दि ०२ जुलै २०२३ ते १६ जुलै २०२३ या कालावधीत "**समर इंटर्नशिप** " कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर इंटर्नशिप कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय, आयुर्वेदिक तसेच दंत वैद्यकीय महाविद्यालयातील १० विद्यार्थी सहभागी झालेले होते. या कार्यक्रमात डॉ. मनाली काणे यांनी या विद्यार्थ्यांना आहारशास्त्र या विषयावर तसेच प्रा. डॉ. व्ही.बी.घुटे यांनी आरोग्य सांख्यिकी या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ अभिजीत जगताप यांनी समर इंटर्नशिप कार्यक्रमाचे नोडल ऑफिसर म्हणून काम पाहिले. |
| ८५. | आरोग्य विज्ञान संकुल व श्री साई समर्थ एज्युकेशनल अँड रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील श्रमिक पत्रकार संघाच्या पत्रकारांसाठी दि १० जुलै २०२३ रोजी अभ्यासकेंद्र येथे एक्यूप्रेशर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर शिबिराचे उद्घाटन मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते व श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. विक्रम खेलबुडे यांच्या उपस्थितीत झाले. सदर प्रशिक्षण शिबिरात एक्यूप्रेशर तज्ञ श्री. पराग कुलकर्णी व त्यांच्या सहकारी टीम ने एकूण ३१ पत्रकारांना एक्यूप्रेशर प्रशिक्षण दिले. |

| | |
|---|---|
| | **भौतिकशास्त्र संकुल: -** |
| ८६. | संकुलामधील संशोधक विद्यार्थ्यांसाठी दि.०५/१०/२०२३ रोजी प्रा. डॉ. जे. व्ही. ठोंबरे, गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला यांचे UV Spectroscopy या विषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आले. |
| ८७. | संकुलामध्ये संशोधक विद्यार्थ्यासाठी दि.१३/१०/२०२३ रोजी प्रा. डॉ. माने आर. एस., स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे आय. आर. स्पेक्ट्रोस्कोपी या विषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आले. |
| ८८. | संकुलामधील सर्व विद्यार्थ्यांकरीता दि.१०/१०/२०२३ रोजी जागतीक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मानसिक आरोग्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. |
| ८९. | संकुलाकडील इतर दैनंदिन कामकाज आढावा व परिपूर्तता करणचे कामे चालू आहेत. |
| | **संगणकशास्त्रा संकुल** |
| ९०. | संगणकशास्त्र संकुलातील कॉम्प्युटर सायन्स व कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या विभागाकडून दि.०९ ते १० ऑक्टोबर २०२३ ( दोन दिवस) Full Stack Development ( Python) या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. |
| ९१. | प्रताप महाविद्यालय अंमळनेर, जि. जळगांव येथे दि. २०/१०/२०२३ रोजी आयोजित National conference on Recent Trends in Mathematics and Statistics Keynote डॉ. व्ही. बी घुटे यांनी Speaker म्हणून व्याख्यान दिले. |
| | **भाषा व वाङ्मय संकुल: -** |
| ९२. | भाषा व वाङ्मय संकुलातील हिंदी विभागामार्फत १४ सप्टेंबर हिंदी दिवसा निमित्त १५ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन माध्यमाव्दारे **शिक्षानिती और राष्ट्रभाषा हिंदी** विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. |
| ९३. | भाषा व वाङ्मय संकुलातील पालि विभागामार्फत १७ सप्टेंबर हा दिवस भन्ते देवमित्त अनागारिक धम्मपाल यांचा जन्मदिन "**जागतिक पालि भाषा गौरव दिन**" म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. या गौरवदिनी डॉ. धम्मदिप वानखेडे सहायक प्रा. दिल्ली विश्वविदयालय यांच्यामार्फत "**अनागारिक धम्मपाल यांचे पालि भाषेच्या अनुषंगाने दक्षिण आशियाई राष्ट्रादरम्यान सौहार्दत आणि सांस्कृतिक संबंध वृंध्दिगत वृिध्दगत करण्यात योगदान**" या विषयावर दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत ऑनलाईन माध्यमाव्दारे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. |
| | **सामाजिक शास्त्रे संकुल :-** |
| ९४. | सामाजिक शास्त्रे संकुलाचे मा. संचालक प्रा.डॉ. गौतम कांबळे यांची प्रस्तुत विद्यापीठाचे दि.२५ मे, २०२३ रोजी प्र-कुलगुरू या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू या पदावर दि.२५ मे, २०२३ ते दि.६ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये विद्यापीठाचे प्र- कुलगुरू म्हणून कार्यरत होते. |
| ९५. | सामाजिक शास्त्रे संकुलाचे मा. संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे यांची नॅक बेंगलोर कडून नॅक मुल्यांकन समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी दि.०८/०८/२०२३ ते दि.२१/१०/२०२३ या कालावधीमध्ये पंजाब, मध्यप्रदेश व कर्नाटक येथील महाविद्यालयांच्या नॅक समितीचे अध्यक्ष म्हणून कामकाज केले आहे. |

| | |
|---|---|
| ९६. | सामाजिक शास्त्रे संकुलातील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्वशास्त्र विभागातर्फे दि.७ ऑक्टोबर, २०२३ रोजी धाराशिव लेणी, कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय तेर जि. धारशिव व तेर परिसरातील मंदिरे येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. या दरम्यान विद्यार्थ्यांना लेणी, मंदिर, या ठिकाणचे सविस्तर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन विभाग प्रमुख डॉ. माया पाटील यांनी केले आहे. |
| ९७. | सामाजिकशास्त्रे संकुलातील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्वशास्त्र विभागातर्फे भारतीय प्रागैतिहास या विषयावर डॉ. प्राची जोशी, चेन्नई यांचे ऑनलाईन /ऑफलाईन माध्यमातून दि.१६ ऑक्टोबर, २०२३ पासून व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. |
| ९८. | दि.१ ऑगस्ट, २०२३ रोजी पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा **उत्कृष्ट शिक्षक** पुरस्कार मास कम्युनिकेशन विभाग प्रमुख डॉ.रवींद्र चिंचोलकर यांना देण्यात आला आहे. |
| ९९. | डॉ. प्रकाश व्हनकडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांची नियुक्ती गोखले इंन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स पुणे या संस्थेमध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली आहे. |
| | **<u>वाणिज्य व व्यवस्थापन संकुलः -</u>** |
| १००. | दि.०७/१०/२०२३ रोजी एम. कॉम. व एम.बी.ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांसाठी एम. कॉम. व एम.बी.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी स्वागत समारंभ आयोजित केलेला होता. |
| १०१. | स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय गोपाळपूर, पंढरपूर येथे झालेल्या युवा महोत्सव २०२३-२४ (उन्मेष सृजनरंगाचा) मध्ये एम. कॉम व एम.बी.ए. एकूण ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. |
| १०२. | अन्नपुर्णा फौंन्डेशन संचलित जय हिंद फूड बँक तर्फे आदर्श पुरस्कार डॉ. रश्मी सचिन दातार यांना दि.३०/०९/२०२३ रोजी देण्यात आलेला आहे. |
| १०३. | बसवेश्वर विचार मंच च्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आदर्श शिक्षक पुरस्कार दि.०३/०९/२०२३ रोजी प्रा.डॉ. वनिता सावंत यांना देण्यात आला. |
| १०४. | ऑगस्ट-२०२३ ते ऑक्टोंबर-२०२३ दरम्यान एम. कॉम. व एम.बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. |
| | **<u>ललितकला व कला संकुल :-</u>** |
| १०५. | ललितकला व कला संकुलातील एम.ए. संगीत गायन या विभागाकडील दि.२४ मार्च, २०२३ रोजी "नेट" या विषयावर सौ. गौरी कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदरील हा व्याख्यानाचे आयोजन ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने गुगल मिट या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. सदर या व्याख्यानास संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. |
| १०६. | ललितकला व कला संकुलातील एम.ए. संगीत तबला पखवाज या विभागाकडील दि.२४ मार्च, २०२३ रोजी "नेट" या विषयावर डॉ. दिपक दाभाडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदरील व्याख्यानाचे आयोजन ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने गुगल मिट या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सव सुर्वण पदक प्राप्त झालेल्या संकुलातील विद्यार्थ्यांचे सत्कार समारभ व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सदर या व्याख्यानास संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. |
| १०७. | ललितकला व कला संकुलातील एम.ए. नाटयशास्त्र या विभागाकडील दि.२३ मार्च, २०२३ रोजी "नेट" या विषयावर डॉ. संपदा कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदरील व्याख्यानाचेआयोजन ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने गुगल मिट या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. सदर या व्याख्यानास संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. |

| | |
|---|---|
| १०८. | ललितकला व कला संकुलातील :- M.V.A. Painting या विभागाकडील दि.१८/०३/२०२३ रोजी नेट या विषयावर व्याख्यानासाठी डॉ. विक्रम कुलकर्णी यांचे व्याख्यान ऑनलाईन व ऑफलाईन गुगल मिट या माध्यमातून आयोजित करण्यात आल होत. संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच चित्र प्रदर्शन दि. १५/०२/२०२३ रोजी ललितकला व कला संकुलात M.V.A. Painting हॉलमध्ये चित्र प्रदर्शन आयोजित केले होते. तत्कालिन प्रमुख अतिर्थी म्हणून डॉ. मृणालिनी फडणवीस कुलगुरु यांच्या उपस्थितीत चित्र प्रदर्शन पार पडले. त्यास संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. |
| १०९. | ललितकला व कला संकुलातील राष्ट्रीय स्तर व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये पारितोषिके प्राप्त झालेल्या माधव लिमये, (गोल्ड मेडल) निशांद व्यास, (गोल्ड मेडल) गीता जांगदड (उत्तजनाथं) विद्याथ्यांचा सत्कार समारंभ मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते दि. ०६ एप्रिल, २०२३ रोजी दु. ३.३० वा. आयोजित करण्यात आला होता. |
| | **मुलांचे व मुलींचे वसतिगृह: -** |
| ११०. | विद्यार्थ्यांना स्वतंत्र भोजन कक्ष व त्यामध्ये दूरदर्शन संच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. |
| १११. | सध्या उपलब्ध असलेले मुलांचे वसतिगृह प्रवेश क्षमता कमी असल्यामुळे नवीन वसतिगृहाची मागणी अभियांत्रीकी विभागास करण्यात आलेली आहे. |
| ११२. | वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वाय-फाय (Wifi) सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. |
| ११३. | मुलींच्या वसति गृहाकरीता प्रिसिजन कॅमशाफटस लिमिटेड, सोलापूर यांनी ऍनालॉग मॉडेल सॅनिटरी नॅपकिन डिस्पेन्सर मशिन नग-६ व ऍटोमॅटिक इलेक्ट्रिक सॅनिटरी नॅपकिन डिस्ट्रॉयर मशिन नग-०६ उपलब्ध (खरेदी) करून दिले आहेत. |

बैठकीत कामकाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या ३१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.

अधिसभेची ३१ वी बैठक शुक्रवार, दि.२८ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ५५५५, दि.२८/०८/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.२८/०८/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.११/०९/२०२३ अशी होती. या मुदतीत डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी पान नं.३४ वरील विषय क्र.१९ मधील ठरावामध्ये दुरुस्ती सुचविली असून ती महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाचा २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार दुरुस्ती अमान्य केलेली आहे.

सबब, अधिसभेचा दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या बैठकींच्या कार्यवृत्तांताची बाब विचारार्थ.

**ठराव:** अधिसभेच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या ३१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. पान क्र. ११ व विषय क्र. ९ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

१) विषय क्र. ५ सोबत जोडलेल्या सहपत्रातील बृहत आराखड्यामध्ये पंढरपूर तालुक्यामध्ये अंबेजोगाई हे गाव नसल्याने अंबेजोगाई ऐवजी गोपाळपूर अशी दुरुस्ती करण्याबाबत शासनास विनंती पत्र पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

२) विषय क्र. १९ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

पूर्वीचा ठराव

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी अधिसभा समितीमध्ये विघटित करण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर नियम क्र. ९ (३) नुसार ३० सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिल्याने नियम क्र.९ (४) अन्वये प्रस्ताव मतास टाकण्यात आला असता, उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिल्याने तो संमत करण्यात आला. त्यामुळे नियम क्र. ९(५) अन्वये अधिसभेने स्वत:चे समितीमध्ये विघटन करण्याचा निर्णय घेतला आणि सदर विषयी चौकशी करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य |
| ३. | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य |
| ४. | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य |
| ५. | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ६. | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्य |
| ७. | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य |
| ८. | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्य |

समितीने सादर केलेला अहवाल पुढील अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

दुरुस्त केलेला ठराव

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी अधिसभा समितीमध्ये विघटित करण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर नियम क्र. ९ (३) नुसार ३० सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिल्याने नियम क्र.९ (४) अन्वये प्रस्ताव मतास टाकण्यात आला असता, उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिल्याने तो संमत करण्यात आला. त्यामुळे नियम क्र. ९(५) अन्वये अधिसभेने स्वत:चे समितीमध्ये विघटन करण्याचा निर्णय घेतला आणि सदर विषयी चौकशी करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | अध्यक्ष |
| २. | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य |
| ३. | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य |
| ४. | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ५. | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्य |
| ६. | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य |
| ७. | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्य |

तसेच सदर समितीच्या कामाची व्याप्ती वाढवून सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवालबाबत समितीने अभ्यास करुन अहवाल पुढील अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

[ २ ] अधिसभेच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेली कार्यवाही विचारार्थ.

टिपणी: अधिसभेची ३१ वी बैठक शुक्रवार, दि.२८ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ५५५५, दि.२८/०८/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.२८/०८/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.११/०९/२०२३ पर्यंत विद्यापीठास कळवाव्यात असे कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सदरचे ठराव / सूचना संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते.

सबब, अधिसभेच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | अधिसभेच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीची दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली. |

[ ३ ] २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील नियम क्र. ६ (१६) नुसार अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे.

टिपणी: २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ नुसार, प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले उत्तर, २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील ६ (१४) अन्वये अधिसभेच्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

| | |
|---|---|
| ठराव: | प्रश्नोत्तराचा तास दुपारी ०२:५८ वाजता सुरु झाला व दुपारी ०३:५८ वाजता संपला या कालावधीत प्रश्न क्र.१ ते २१ विचारण्यात आले. |

**[ ४ ] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१ (यघ) नुसार, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५(२) नुसार, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s. SKVM & Company, Solapur यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s. SKVM & Company, Solapur यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.

लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल दि.१०/१०/२०२३ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.

| | |
|---|---|
| ठराव क्र.२ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) नुसार सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन व मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.२५/१०/२०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६)(क) व ३१(यघ) नुसार, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.१०/१०/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

सबब, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) नुसार अधिसभेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१ (यघ) नुसार, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ ५ ] श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांची जयंती, पुण्यतिथी, विद्यापीठ नामविस्तार दिन, हा यथोचित सन्मानाने व विविध समारंभ व उपक्रमे घेऊन साजरा करण्यासाठी विद्यापीठाणे व्यवस्थापन परिषद, अधिसभा सदस्य, संकुल शिक्षक व संविधानिक अधिकारी यांची एक समिती स्थापन करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती, पुण्यतिथी, व नामविस्तार दिनाची विविध उपक्रम व समारंभ साजरे करण्यासाठी समिती गठीत करण्याचा प्रस्ताव या अधिसभे समोर सादर करीत आहे."

| ठराव: | **सदरचा ठराव श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी मांडला. त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. सखोल चर्चेअंती सर्वानुमते ठराव मान्य करुन असे ठरले की, सदर बाबतची कार्यवाही संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांच्याकडून व्हावी व ते सदर समितीचे अध्यक्ष असतील आणि उर्वरित समिती गठीत करतील.** |
|---|---|

[ ६ ] श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये प्रवेशित इच्छुक विध्यार्थ्यांकरीता "Diploma in Astronomy and Astrology" (खगोलिय व ज्योतिष विद्या पदविका अभ्यासक्रम) हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम विद्यापीठा मध्ये कौशल्य विकास केंद्राच्या वतीने सुरु करण्याची बाब मी विद्यापरिषदेकडे /अधिष्ठाता मंडळ/ कौशल्य विकास केंद्र यांच्याकडे शिफारस करत आहे."

| ठराव: | **सदरचा ठराव श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी मांडला. त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.** |
|---|---|

[ ७ ] डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान, परंपरा (IKS) या विषयाला फार महत्त्व दिलेले आहे. यातून प्राचीन ज्ञान, परंपरा व विज्ञान याचे संवर्धन, संशोधन व जोपासना होणार आहे. या अनुषंगाने विद्यापीठाने भारतीय ज्ञान, परंपरा (IKS) साठीचे अभ्यास मंडळे विभागांतर्गत विशेष कक्ष (IKS Cell) ची स्थापना करावी अशी शिफारस ही अधिसभा अभ्यास मंडळे व विद्यापरिषदेस करीत आहे."

| ठराव: | **सदरचा ठराव डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी मांडला. त्यास डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.** |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

[ ८ ] प्रा. डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठाकडे महाविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या विविध प्रकाराच्या तक्रारी असतात. परंतु सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुके १०० कि.मी. पर्यंत लांब असल्याने त्या तक्रारी विद्यार्थी देऊ शकत नाहीत. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण समिती निर्माण करण्यात यावी व त्यासाठी ऑनलाईन सेवा (Online Portal) उपलब्ध करुन द्यावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव प्रा. डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार यांनी मांडला. त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. विद्यापीठ स्तरावर तक्रार निवाकरण समिती कार्यरत आहे. मात्र अर्ज करणेसाठी ऑनलाईन सेवा (Online Portal) उपलब्ध करुन देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ ९ ] श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ अधिविभागामध्ये ग्रामीण भागातून विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्याचे प्रमाण जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे विद्यापीठात विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे वसतिगृहाच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव तयार करुन त्याचे बांधकाम जलद गतीने करण्याची शिफारस ही अधिसभा बांधकाम समितीकडे करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी मांडला. त्यास ॲड श्रीमती सुनंदा करण भगत यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १० ] श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ स्थापन होऊन २० वर्षे झाली आहेत, विद्यापीठात १७० कायम कर्मचारी व १५० पेक्षा जास्त शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचा सातत्याने विद्यार्थी, पालक व विविध संस्था शिक्षक यांच्याशी संबंध येत असतो त्यामुळे कर्मचारी विविध स्टेकहोल्डर्स यांच्यातील संबंध सौदार्याचे व समन्वयाचे रहावेत आणि विद्यापीठात कार्यसंस्कृती विकसीत व्हावी म्हणून विद्यापीठ कर्मचाऱ्यांकरीता प्रबोधन वर्ग, उद् बोधन वर्ग व कार्यशाळा तीन महिन्यातून किमान एकवेळा आयोजित करण्याचा प्रस्ताव ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी मांडला. त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ ११ ] डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.७ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी खालीलप्रमाणे सुधारणेसह ठराव सादर केला.

"ICTRD, व्हेरीटोस व Splashgain software कंपनीच्या परीक्षा व इतर विभागातील कामकाजातील अकार्यक्षमतेमुळे सदर कंपनीला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याची शिफारस हि अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी मांडला. त्यास श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १२ ] डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित सर्व रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे अद्यावत डेटा सेंटर सुरु करण्याची शिफारस हि अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडला. त्यास डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १३ ] डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार पदवीत्तर अभ्यासमंडळे (PG BOS) तात्काळ गठीत करावी अशी शिफारस हि अधिसभा विद्यापरिषदेस करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडला. त्यास डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १४ ] श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे ग्रंथालय शुल्क जास्त असल्याने ती कमी करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी मांडला. त्यास डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १५ ] श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंबंधित RR, ०० U.M, Revaluation, Absent इत्यादी तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामध्ये स्वतंत्र कक्ष सुरु करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी मांडला. त्यास श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १६ ] श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सध्या विद्यापीठामध्ये प्रवेश परीक्षा व इतर संबंधित कामासाठी विविध प्रकारचे सॉफ्टवेअर वापरले जाते. सदर कामात सुसूत्रता आणण्यासाठी अनुभवी व सक्षम एकाच कंपनीला काम देण्याची शिफारस हि आधीसभा व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडला. त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १७ ] ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सॉफ्टवेअरच्या टेक्निकल प्रॉब्लेम मुळे अथवा इतर करणामुळे आपल्याकडील बऱ्याच विद्यार्थ्यांचा सर्व विषय फेस असा रिझल्ट येतो परंतु विद्यार्थ्यांना खात्री असते की ते सर्व विषयांत उत्तीर्ण होणार आहेत, यावेळी फक्त आपण दोन विषयाचे पुनर्मूल्यांकन करु शकत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, तरी दोन विषयाचे पुनर्मुल्यांकन ही अट शिथिल करुन विद्यार्थ्यांना खात्री वाटत असल्यास सर्व विषयाचे पुनर्मूल्यांकन करण्याची मुभा द्यावी अशी ही आधी सभा विद्यार्थी कल्याण मंडळास शिफारस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी मांडला. त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १८ ] ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"एलएलबी हा पदवीत्तर व्यवसायिक अभ्यासक्रम असल्याने विद्यार्थ्यांना किमान दहा वर्षे वकील व्यवसाय करत असलेल्या तज्ञ वकिलांमार्फत अभ्यासक्रमात शेवटचे वर्ष प्रशिक्षित करणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने महाविद्यालयामध्ये एलएलबीसाठी प्राध्यापकांची नियुक्ती करताना वकीली क्षेत्रातील कामाचा अनुभव विचारात घेणे जरुरीचे आहे अशी शिफारस ही आधी सभा विद्यार्थी कल्याण मंडळास करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी मांडला. त्यास श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १९ ] श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय सर्व विद्यार्थ्यांना व नागरिकांना होण्यासाठी म्हणून विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा २०२० नुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यास क्रमाची रचना करत असताना मानव्यविद्या शाखा अंतर्गत (सामाजिक शास्त्रे व भाषा विषय) जे अभ्यासक्रम तयार केले जात आहेत त्या अभ्यासक्रमामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्य आणि कर्तुत्वाचा इतिहासाचा व विविध पैलूंचा समावेश असलेले इतिहास, साहित्य, प्रशासन कौशल्य जन कल्याणकारी धोरण, कौशल्य विकासाचे धोरण या बाबींचा समावेश करणारे नवे अभ्यासक्रम, पेपर, साहित्य यांचा समावेश करण्यासंदर्भात तात्काळ पाऊल उचलणे गरजेचे आहे. असे केल्यास भविष्यात विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार रुजून सक्षम पिढी निर्माण होईल. म्हणून ही आधीसभा पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय सर्व विद्यार्थी व नागरिकांना होण्यासाठी म्हणून मान्वयविद्या शाखातर्गत नव्या अभ्यासक्रमाचा व पेपरचा समावेश करण्याच्या प्रस्ताव स्वीकारण्याची शिफारस अभ्यास मंडळ विभाग व विद्या परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा ठराव श्री. संजय नामदेव साळुंखे यांच्या अनुपस्थित श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी मांडला. त्यास ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.** |

[ २० ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"The Adhi Sabha recommends to the Management and Academic Council for establishment of the Industrial Collaboration and sponsored Research Centre in Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा ठराव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.** |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून वंदे मातरम नंतर बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

कुलसचिव
सदस्य सचिव, अधिसभा

मा. कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा